मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२३। पान १

# सात लाचखोर कर्मचारी पुन्हा सेवेत

## निलंबित कर्मचाऱ्यांना महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पुन्हा घेतले सेवेत

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उद्यान, नगररचना आणि आरोग्य विभागाच्या सात लाचखोर निलंबित कर्मचाऱ्यांना महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पुन्हा सेवेत घेतले आहे. निलंबन आढावा समितीच्या शिफारशीनुसार सेवेत घेतल्याचे प्रशासनाने सांगितले. उद्यान विभागाचे पर्यवेक्षक संतोष लांडगे, संजीव राक्षे, उद्यान सहायक मच्छिंद्र कडाळे, भरत पारखी, नगर रचना विभागाचे सर्व्हेअर संदीप लबडे, सफाई कामगार दिलीप गायकवाड,




सचिन डोळस यांना लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. त्यामुळे निलंबित केले होते. प्रशासनाने काही महिन्यांनी पुन्हा त्यांना सेवेत घेतले आहे. यामधील चार कर्मचाऱ्यांची महापालिकेकडून विभागीय चौकशी सुरू आहे. तर, तीन कर्मचाऱ्यांची न्यायालयात सुनावणी सुरू आहे. चौकशी, न्यायालयीन सुनावणीच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून त्यांचे निलंबन रद्द करण्याची शिफारस निलंबन आढावा समितीने केली. त्यानुसार निलंबन रद्द करून अकार्यकारी पदावर व जनसंपर्क येणार नाही अशा ठिकाणी त्यांना नेमणूक देण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार या कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द करण्यात आले. लांडगे, राक्षे, कडाळे, पारखी यांना पुन्हा उद्यान विभागात नियुक्ती देण्यात आली आहे. तर, सर्व्हेअर लबडे यांना निवडणूक विभाग, सफाई कामगार गायकवाड व डोळस यांना आरोग्य मुख्यालयात नेमण्याचे आदेश आयुक्त सिंह यांनी दिले आहे.

### न्यायालयीन सुनावणीच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निलंबन रद्द

**» प्रशासनाने काही महिन्यांनी पुन्हा त्यांना सेवेत घेतले आहे. यामधील चार कर्मचाऱ्यांची महापालिकेकडून विभागीय चौकशी सुरू आहे. तर, तीन कर्मचाऱ्यांची न्यायालयात सुनावणी सुरू आहे. चौकशी, न्यायालयीन सुनावणीच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून त्यांचे निलंबन रद्द करण्याची शिफारस निलंबन आढावा समितीने केली. त्यानुसार निलंबन रद्द करून अकार्यकारी पदावर व जनसंपर्क येणार नाही अशा ठिकाणी त्यांना नेमणूक देण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार या कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द करण्यात आले.**

# स्पाईन रोड बाधितांच्या भूखंडावर अतिक्रमण

## सेक्टर ११ येथील धक्कादायक प्रकार; पीएमआरडीए, पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकातून जाणाऱ्या स्पाईन रस्त्यात बाधित होणाऱ्या रहिवाशांचा पुर्नवसनाचा प्रश्न अद्याप पूर्णत: सुटलेला नसतानाच संबंधित लाभार्थ्यांना आरक्षित केलेल्या भूखंडावर अतिक्रमण सुरू झाले आहे. मात्र, याकडे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने सोईस्कर दुर्लक्ष केले आहे. स्पाईन रस्ता बाधितांसाठी १२६ रहिवाशांच्या पुर्नवसनासाठी



आवश्यक असलेला पेठ क्रमांक ११ येथील भूखंडावर जागा देण्यात आली आहे. त्या ठिकाणी अद्याप लाभार्थ्यांनी बांधकामे सुरू केलेली नाहीत. तत्पूर्वीच या भूखंडावर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांमधून चिंता व्यक्त केली जात आहे. स्पाईन रस्ता विकसित करत असताना त्रिवेणीनगर चौकातील काही घरे बाधित होत आहेत. त्या घरांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी गेल्या १४ वर्षांपासून प्रलंबित होती. दरम्यान, महापालिका प्रशासनाने लाभार्थ्यांना १२५० स्के.मी.भूखंडाचा परतावा देण्याची प्रक्रिया सुरू केली. अद्याप काही बाधितांना तांत्रिक अडचणींमुळे काहीना जागा तर बऱ्याच जणांना अलॉटमेंट लेटर देखील मिळालेले नाही. असे असताना मोकळ्या भूखंडावर होणारे अतिक्रमण प्रशासन रोखणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. लाभार्थ्यांना आरक्षीत जागेवर पत्राशेडचे काम बेकायदेशीपणे सुरू आहे. याबाबत स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रशासनाने टाळाटाळ केली जात आहे. महापालिका प्रशासनाने वाटप केलेल्या भूखंडावर अतिक्रमण होत आहे. प्रकल्पबाधित नागरिकांना दिलेल्या जागांवर अतिक्रमण होत असेल आणि प्रशासन बघ्याची भूमिका घेत असेल, तर दाद कुणाला मागायची असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### लाभार्थ्यांमधून चिंता व्यक्त

**» पाईन रस्ता बाधितांसाठी १२६ रहिवाशांच्या पुर्नवसनासाठी आवश्यक असलेला पेठ क्रमांक ११ येथील भूखंडावर जागा देण्यात आली आहे. त्या ठिकाणी अद्याप लाभार्थ्यांनी बांधकामे सुरू केलेली नाहीत. तत्पूर्वीच या भूखंडावर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांमधून चिंता व्यक्त केली जात आहे. स्पाईन रस्ता विकसित करत असताना त्रिवेणीनगर चौकातील काही घरे बाधित होत आहेत. त्या घरांचे पुर्नवसन करावे, अशी मागणी गेल्या १४ वर्षांपासून प्रलंबित होती.**

# पिंपरी-चिंचवडमधील ३० हजार इलेक्ट्रिक वाहनचालक हैराण!

## चार्जिंग स्थानके उभारण्यासाठीच्या निविदेला प्रतिसाद मिळाला नाही

**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील नागरिकांना विजेवरील वाहने चार्जिंग करण्याची सुविधा देण्यासाठी महापालिकेने २२ ठिकाणी खासगी संस्थेद्वारे चार्जिंग स्थानके उभारण्याचे नियोजन केले आहे. मात्र, दीड वर्षात तीन वेळा राबविलेल्या निविदा प्रक्रियेला प्रतिसादच मिळाला नाही. त्यामुळे आता निविदेमधील अटी-शर्तीत बदल करून चौथ्यांदा सुधारित निविदा प्रसिद्ध केली जाणार आहे. शहरात सुमारे ३० हजार ई-वाहनांची नोंद आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा अधिक वापर होण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी






महापालिकेने पुढाकार घेतला आहे. चार्जिंग स्थानकांसाठी मुख्य इमारतीसह शहराच्या विविध भागांतील २२ ठिकाणे निश्चित केली आहेत. खासगी संस्थेकडून स्वत: बांधा आणि संचलित करा या पद्धतीने चार्जिंग सुविधा वाजवी दराने उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. या संस्थांना महापालिकेकडून केवळ जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या जागेवर आठ वर्षांसाठी स्वत:च्या खर्चाने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेणे, ईव्ही चार्जिंग स्थानक उभारणे आणि चालन व देखभाल संस्थेने करणे आवश्यक आहे. ग्राहकांसाठी कमाल मर्यादा दरावरील महसुली वाटणीतील काही प्रमाणात रक्कम महापालिकेला या माध्यमातून देणे आवश्यक आहे. महसुली वाटणीतील अधिकतम रक्कम देणाऱ्या संस्थेला काम देण्याचे नियोजन केले. मात्र, गेल्या दीड वर्षात तीन वेळा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. निविदेमधील जाचक अटींमुळे खासगी संस्थांकडून प्रतिसादच मिळाला नाही. त्यामुळे प्रशासनाने आता निविदेमधील अटी-शर्तीत काही बदल करून फेरनिविदा राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

> “ चार्जिंग स्थानके उभारण्यासाठीच्या निविदेला प्रतिसाद मिळाला नाही. काही संस्थांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा केली आहे. निविदांना का प्रतिसाद मिळत नाही, याचा अभ्यास केला. नोव्हेंबरअखेर पुन्हा निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
>
> — प्रदीप जांभळे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

संस्थेला तीन वर्षांचा अनुभव असावा, १८ चार्जिंग स्थानके असावीत, अशा जाचक अटी आहेत. त्यामुळे निविदांना प्रतिसादच मिळत नसल्याचे दिसून आले. शहरातील नागरिकांना विजेवरील वाहने चार्जिंग करण्याची सुविधा देण्यासाठी महापालिकेने २२ ठिकाणी खासगी संस्थेद्वारे चार्जिंग स्थानके उभारण्याचे नियोजन केले आहे. मात्र, दीड वर्षात तीन वेळा राबविलेल्या निविदा प्रक्रियेला प्रतिसादच मिळाला नाही. त्यामुळे आता निविदेमधील अटी-शर्तीत बदल करून चौथ्यांदा सुधारित निविदा प्रसिद्ध केली जाणार आहे.

# बलशाली भारत घडवण्याच्या राष्ट्रकार्यात योगदान द्या

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे आवाहन

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** संघटनेत काम करताना ‘एकमेकां सहाय्य करू’ हे धोरण प्रत्येकाने अंगीकारताना आपले १०० टक्के योगदान देणे गरजेचे आहे. कार्यकारिणी आणि कार्यकर्ता हे आपल्या संघटनेची दोन चाके आहेत. या दोन्ही गोष्टीच्या माध्यमातून आपले ‘उद्दिष्ट’ साध्य करता येवू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत जगातील बलशाली राष्ट्र म्हणून विकसित होत आहे. या राष्ट्रकार्यामध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पदभार



स्वीकारल्यानंतर कार्यकारिणी जाहीर केली होती. या कार्यकारिणीचा पदवाटप कार्यक्रम मोरवाडी येथील पक्षाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात बुधवारी झाला. यावेळी जगताप बोलत होते. यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, भाजपा शहर सरचिटणीस शीतल शिंदे, शैला मोळक, अजय पाताडे, संजय मंगोडीकर, नामदेव ढाके, मावळ विधानसभा संयोजक सदाशिव खाडे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळुराम बारणे, भाजयुमो शहराध्यक्ष तुषार हिंगे, शहर अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष भीमा बोबडे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा सुजाता पालांडे, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे, सोमनाथ भोंडवे, संदीप नखाते, संतोष तापकीर आदी उपस्थित होते. शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, पक्षाची धोरणे, मूल्ये ही सर्वात आधी कार्यकारिणीमध्ये रुजविणे आवश्यक आहे. हीच मूल्ये शेवटच्या मतदारांपर्यंत पोहचविण्याची सर्वात मोठी जबाबदारी कार्यकारिणीवर असते. एकदा ही मूल्ये आणि धोरणे शेवटच्या मतदारापर्यंत पोचविली की, तो मतदार शेवटपर्यंत पक्षाशी जोडला जातो, असा मतदार जोडणे हेच सध्याच्या कार्यकारिणीचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मंगोडीकर यांनी, तर आभार अजय पाताडे यांनी मानले.

# ‘ससून’चा कारभार अधांतरी!

## नवीन अधिष्ठात्यांच्या नियुक्तीचा आदेशच नाही

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठाता पदावरून डॉ. संजीव ठाकूर यांना राज्य सरकारने पदमुक्त केले होते. त्याच दिवशी उच्च न्यायालयानेही डॉ. ठाकूर यांची नियुक्ती रद्द करून आधीचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्या पुनर्नियुक्तीचे आदेश दिले होते. त्यानंतर डॉ. काळे हे अधिष्ठातापदाचा कार्यभार स्वीकारून लगेचच रजेवर गेले.

मात्र, तब्बल ११ दिवसांनंतरही डॉ. काळे यांच्या नियुक्तीचा आदेश न निघाल्याने ससूनचा कारभार अधांतरी सुरू आहे. ससूनच्या अधिष्ठातापदावरून त्यांची बदली करण्याचा आधीचा आदेश उच्च न्यायालयाने १० नोव्हेंबरला रद्द केला होता. त्याचदिवशी अमली पदार्थ तस्करीचा सूत्रधार ललित पाटील पलायन प्रकरणात तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ठाकूर दोषी आढळले. राज्य सरकारने डॉ. ठाकूर यांना पदमुक्त केले तर अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकाते यांना निलंबित केले. त्यामुळे अधिष्ठातापद रिक्त झाल्याने डॉ. काळे यांनी तातडीने ११ नोव्हेंबरला या पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. काळे हे कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेचच रजेवर गेले. त्यानंतर अद्याप ११ दिवसांनंतरही त्यांच्या नियुक्तीचा आदेश निघालेला नाही. सध्या ससूनच्या अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. शेखर प्रधान यांच्याकडे आहे. विशेष म्हणजे सेवा ज्येष्ठतेनुसार डॉ. श्रीनिवास शिंत्रे यांच्याकडे हा अतिरिक्त कार्यभार सोपविणे आवश्यक होते. मात्र, ते रजेवर असल्याने डॉ. प्रधान यांच्याकडे ही जबाबदारी आली आहे. त्यामुळे अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार कोणीच स्वीकारण्यास तयार नसल्याची चर्चा ससूनमध्ये रंगली आहे. ललित पाटील ड्रग्स प्रकरणात सध्या (डरश्रळीं झरींळश्र ृऔंस उरीश) ससून रुग्णालयातील वॉर्ड नंबर १६ मधील क्लार्क आणि नर्स यांची चौकशी करण्यात येत आहे. पुणे पोलिसांकडून ही चौकशी करण्यात येत आहे.

ललित पाटीलचा ससून रुग्णालयातील मुक्काम वाढवण्यात हे क्लार्क आणि नर्स प्रयत्नशील होते का?, त्यांनी ललिच पाटीलला कोणत्या प्रकारची मदत केली आहे का? याची सध्या चौकशी करण्यात येत आहे. पुणे पोलिसांचा रोख हा ससून रुग्णालयाच्या व्यवस्थापनावर केंद्रीत झाला आहे. ललित पाटीलच्या मुक्कामासाठी नक्की कोण प्रयत्न करत होते? आणि ललित पाटीलला ससूनमधून पळून जाण्यासाठी कोणी मदत केली? ही माहिती घेण्यासाठी पुणे पोलिसांनी आता कंबर कसली आहे. त्यामुळे ही चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणात ससूनमध्ये काम करणाऱ्या क्लार्क महेंद्र शिवटे यांचं नाव सातत्याने समोर येत आहे. शिवटे हे कैद्यांना कुठे आणि किती दिवस ठेवायचं यात सहभागी असतात त्यामुळे त्यांच्यावर संशय व्यक्त केला जात आहे. ड्रग्स माफिया ललित पाटील याला दाखल करण्यास आता ससून रुग्णालयाचा नकार देत आहे. ड्रग्स तस्कर ललित पाटील याला ससून रुग्णालय प्रशासन आता दाखल करून घ्यायला तयार नाहीत.ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेल्यानंतर डॉक्टर आणि पोलिसांवर संशय होता. त्यानंतर या दोघांनीही ललित पाटीलला मदत केल्याचं पुढे आलं. त्यानंतर अनेक जणांवर संशय व्यक्त करण्यात आला. या प्रकरणी दोन पोलिसांना बडतर्फ करण्यात आलं. ससून रुग्णालयातील डीन संजीव ठाकूर यांना पदमुक्त करण्यात आलं आणि डॉ. देवकाते यांना निलंबित करण्यात आलं. या सगळ्या प्रकरणानंतर आता ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी धास्ती घेतली आहे. त्यामुळे त्याला रुग्णालयात भर्ती करुन घेत नाही आहे. त्याच्यावर उपचार करुन त्याला परत पाठवण्यात येत आहे.



> **“डॉ. विनायक काळे यांची ससूनच्या अधिष्ठातापदी नियुक्ती करण्याचा आदेश मुख्यमंत्र्यांकडून निघणे अपेक्षित आहे. याबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाने पाठविला आहे. त्यावर लवकरच कार्यवाही होणार आहे. तत्कालीन अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांची पदमुक्ती आणि डॉ. प्रवीण देवकाते यांच्या निलंबनाचा आदेश त्याचवेळी तातडीने काढण्यात आला होता.**
>
> **– प्रवीण वाघमारे,**
> **सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग**

# राज्यातील शाळांमध्ये आता ’वाचन चळवळ’

## ४१ टक्के मुलांना मजकूर वाचता येत नसल्याचे आढळून आले

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात इयत्ता तिसरीच्या ३० टक्केपेक्षा जास्त मुलांना लहान मजकूर, पाचवीपर्यंतच्या ४१ टक्के मुलांना त्यांच्या श्रेणीचा योग्य मजकूर वाचता येत नसल्याचे आढळून आले आहे.

मात्र आता हे चित्र बदलण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये वाचन चळवळ राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. विद्यार्थी भाषा नैसर्गिकरित्या शिकतात. मात्र विद्यार्थ्यांनी वाचन जाणीवपूर्वक शिकले पाहिजे. इयत्ता दुसरीमध्ये मुलांना वाचन येणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून वाचन होत नसल्याचे राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे २०२६ पर्यंत राज्यातील तिसरीपर्यंतचे प्रत्येक मूल ओघवते वाचन करू शकेल, आठवीपर्यंतचे प्रत्येक मूल शिकण्यासाठी वाचू शकेल हे सुनिश्चित करणारी आनंददायी वाचनाची चळवळ निर्माण करण्याच्या उद्देशाने आता राज्यात वाचन चळवळ राबवली जाणार आहे. या वाचन चळवळीत



शालेय शिक्षण विभाग, राज्यसरकार, युनिसेफ, रीड इंडिया आणि प्रथम बुक्स या संस्थांचा सहभाग आहे. मुलांना वाचनाची सवय लावण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालकांकडून मार्गदर्शक सूचना तयार केल्या जातील. राज्यातील शासनमान्य शाळा आणि खासगी शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल. मात्र खासगी शाळांना पुस्तके दिली जाणार नाहीत. उपक्रमात वर्षभरातील काही तारखा निश्चित करून शाळेत वाचन वर्ग आयोजित केले जातील. त्यात विद्यार्थी पुस्तकांची देवाणघेवाण करतील. त्याशिवाय शालेय स्तरावर शाळेच्या वेळापत्रकातच साप्ताहिक दोन वाचन तासिकांचा समावेश करणे, गोष्टींचा रविवार उपक्रमाअंतर्गत दर शनिवारी ई-पुस्तके उपलब्ध करून देणे, आनंदाचा तासअंतर्गत ‘ड्रॉप एव्हरीथिंग अँड रीड’ या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या वेळापत्रकात किंवा शाळा सुरू होण्यापूर्वी १५-२० मिनिटे शिक्षक आणि मुलांसाठी कथा पुस्तके वाचण्यासाठी आनंदाचा तास वेळा पत्रकात समाविष्ट केला जाईल. मुलांना वाचनाच्या संधी उपलब्ध करण्यासाठी लोकसहभाग, मुलांना वाचनाचे महत्त्व समजावणे, मराठी भाषेचा नवीन वाचक वर्ग तयार करणे, मुलांवर चांगले संस्कार करणे, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटकांतून रसास्वादाची दृष्टी निर्माण करण्याचा या चळवळीचा उद्देश आहे. या उपक्रमासाठी ब्रँड ॲम्बेसिडरची नियुक्ती केली जाणार आहे.

# मराठा समाजासह खुला प्रवर्गातील जातींच्या मागासलेपणाचे निकष निश्चित

## राज्य मागास आयोगाच्या बैठकीत मोठा निर्णय

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असतांना, हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारकडून सर्वच पद्धतीने प्रयत्न केले जात आहे. दरम्यान, अशात राज्य सरकारकडून आता मागासवर्ग आयोगाला देखील सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर पुण्यात राज्य मागासवर्ग आयोगाची आज बैठक पार पडली. आजच्या बैठकीत मराठा समाजासह, ओबीसी आणि इतर खुल्या प्रवर्गातील जातींमधील मागासलेपणाचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. जवळपास २० निकष आजच्या बैठकीत निश्चित झाले. राज्यात आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा समाज, ओबीसी समाजाच्या नेत्यांमध्ये



दावे-प्रतिदावे करण्यात येत आहे. त्याशिवाय, धनगर समाजाकडूनही आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आज राज्य मागासवर्ग आयोगाची बैठक पार पडली. ओबीसी, व्हीजेएनटी आणि मराठा समाजासह खुल्या प्रवर्गातील सर्व समाज घटकांचे आयोगाकडून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणासाठीचे निकष एकसमान असतील असा धोरणात्मक निर्णय आयोगाने घेतला आहे. याचा अर्थ सर्व सामाज घटकांचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण मोजण्याचे निकष एकच असणार आहे. हे निकष आजच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. सर्व मिळून एकूण २० निकष असणार आहेत. या निकषांच्या आधारे प्रश्नावली निश्चित होईल आणि दहाच दिवसात सर्वेक्षणाला सुरुवात होणार. त्यासाठी एक लाखाहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांना कामाला लावण्यात येईल. घरोघरी जाऊन हे सर्वे क्षण होणार. सर्वेक्षणाच्या कामासाठी जिओ टॅगिंगचा उपयोग करण्यात येणार आहे. जेणेकरून सर्वे क्षणाची वैधता वाढेल. साधारणपणे दोन महिन्यात हे सर्वेक्षण पूर्ण करण्याचा मानस राज्य मागास आयोगाने व्यक्त केला आहे. जेव्हा-जेव्हा राज्यात आरक्षणाचा मुद्दा समोर येतो, त्यावेळी मागासवर्ग आयोगाबाबत निर्णय घेण्यात येतात. तर, राज्य मागासवर्ग आयोगाकडून उचलण्यात येणारी पाऊलं ऐनवेळी उचलण्यात येतात असे आरोप करण्यात येतो. विशेष म्हणजे, २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण फेटाळल्यानंतर मागील दोन वर्षांत राज्य सरकारकडून मागासवर्ग आयोगाला मराठा समाजाचे सर्वेक्षण करण्यासाठी कोणताही निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही. सोबतच, अपेक्षित यंत्रणा देखील पुरवण्यात आली नाही. पण, मनोज जरांगे पाटलांच्या रुपाने मराठा आंदोलनाने जोर पकडल्यानंतर राज्य सरकारकडून आता मागासवर्ग आयोगाला सर्वेक्षण करण्यास सांगण्यात आले आहे.तर, आयोगाच्या सदस्यांच्या मते या सर्वेक्षणाला किमान सहा महिन्यांपेक्षा अधिक वेळ लागू शकतो. पण, जरांगे यांनी सरकारला फक्त २४ डिसेंबरपर्यंत वेळ दिला आहे.

# पुण्यातील वेस्टएंड मॉलमध्ये आग; जीवितहानी नाही

## शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याची शक्यता

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. दरम्यान पुण्यातील वेस्टएंड मॉलमध्ये काल रात्री मोठी आग लागली होती. मात्र या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या मदतीने मॉलमध्ये असणाऱ्या नागरिकांची सुखरूप सुटका करण्यात आली. पुण्यातील औंध भागात असलेल्या वेस्टएंड मॉल आहे. घटनास्थळी मॉलच्या एक्झॉस्ट डक्टमधे आग लागल्याचे दिसून येताच अग्निशमन दलाचे जवान यांनी तिसऱ्या मजल्यावर जाऊन एक्झॉस्ट ब्लोअरचा पख्याला फायर एक्स आणि कटावणीच्या साह्याने मोठे छिद्र करुन मॉलमधील सुरू असणाऱ्या स्थायी अग्निशमन यंत्रणेचा वापर करत पाणी मारुन आग पुर्ण विझवली. घटनेच्या वेळी उपस्थित नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. ही आग इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज असून वेळीच आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठा धोका टळला. या संपूर्ण



घटनेत अग्निशमन दलाच्या जवानांनी महत्वाची भूमिका निभावली आहे. यात आगीच्या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी वेस्ट एंडमॉलजवळ पोहचले. रोज शेकडो लोक या मॉलमध्ये येत असतात हे पाहून जवानांनी सगळ्या गोष्टींची खबरदारी घेतली आणि मॉलमधील नागरिकांना बाहेर काढले.

त्यांच्या या कार्यामुळे मोठी जीवितहानी टळली. पुण्यातील अग्निशमन दलाच्या जवानांनी कायमच उत्तम कामगिरी बजावली आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील अग्निशमन दलातील जवान हर्षद येवले यांनी देखील कुटुंबीयांना जत्रेला घेऊन जात असताना रस्त्यावर पेट घेत असलेली गाडी पाहिली आणि जीवाची तमा न बाळगता कुटुंबीयांना सोबत घेत गाडीची आग विझवली होती. त्यांनी कुटुंबीय सोबत असताना आणि महत्त्वाचं म्हणजे सुट्टीवर असताना केलेल्या कामाचे सर्वत्र कौतुक झालं होतं. पुण्यातील उंड्री परिसरात रात्री एका चालत्या बीएमडब्ल्यू कारने अचानक पेट घेतला. त्यावेळी ऑफ-ड्युटी असलेला अग्निशमन दलाचा जवान मदतीसाठी आला. पेटलेली गाडी पाहून त्यांनी तत्परतेने आगीच्या दिशेने धाव घेत गाडीत कोणी अडकले आहे का याची प्रथम पाहणी केली. मग धर्मावत पेट्रोल पंप येथील अग्निरोधक उपकरण वापरुन बीएमडब्ल्यु-एक्सवन या पेटलेल्या वाहनाची प्राथमिक स्वरुपात आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला होता.